# महाराष्ट्र शासन , ग्रामविकास विभाग.

## जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहीरात

## पदभरती 2019 जाहीरात क्र.- 01/2019

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांचे आस्थापनेवरील गट-क संवर्गातील खालीलप्रमाणे रिक्त पदे भरण्याकरिता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पदभरती साठी संवर्गनिहाय घोषीत पदे

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| 1 (अ) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 14 |
| 1 (ब) | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 01 |
| 2 | कंत्राटी ग्रामसेवक | 28 |
| 3 | औषध निर्माता | 06 |
| 4 (अ) | आरोग्य सेवक (पुरुष) | 12 |
| 4 (ब) | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | 27 |
| 5 | आरोग्य सेवक (महिला) | 111 |
| 6 | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | 37 |
| 7 | पशुधन पर्यवेक्षक | 06 |
| 8 | वरिष्ठ सहायक (लेखा) | 02 |
| 9 | अंगणवाडी पर्यवेक्षिका | 06 |
| 10 | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | 03 |
| 11 | विस्तार अधिकारी (सांखिकी) | 04 |
| 12 | कनिष्ठ लेखाधिकारी | 02 |
| | एकुण पदे | 259 |

अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | ऑनलाईन पद्धतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | दि. 26/03/2019 रोजी रात्री 10.00 P.M. वाजेपासुन | दि.16/04/2019 रोजी मध्यरात्री 11.59 P.M. पर्यन्त |

**पदभरती करिता** सविस्तर जाहिरात ही www.mahapariksha.gov.in व जिल्हा परिषद परभणी चे www.zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वरील पदांची सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय पदांची माहिती, शैक्षणिक अर्हता व अनुभव, कमाल व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना, परीक्षेचे स्वरुप, निवडपद्धती, सर्वसाधारण अटी व शर्ती इत्यादींबाबत अधिक माहिती www.mahapariksha.gov.in व जिल्हा परिषद परभणी चे www.zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज करण्यासाठी www.mahapariksha.gov.in हे संकेतस्थळ दिनांक 26/03/2019 रोजी रात्री 10.00 P.M. वाजेपासुन ते दि.16/04/2019 रोजी मध्यरात्री 11.59 P.M. वाजेपर्यंत कार्यरत राहील. अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी सविस्तर जाहिरातीत दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून अर्ज करावेत.

भरती प्रक्रीया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदाच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा करता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण : परभणी
दिनांक : 01/03/2019

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, परभणी**